# जनसुनावणीचे इतिवृत्त

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रस्तावित २०० टन प्रतिदिन क्षमता असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प गाव बारवे ता. कल्याण जि. ठाणे च्या अनुषंगाने पर्यावरण विषयक जनसुनावणी दिनांक ०८/११/२०१७ रोजी दुपारी ०२:३० वाजता आचार्य अत्रे सभागृह, शंकरराव चौक, कल्याण (प) जिल्हा - ठाणे, या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

1) **श्री. अनिल पवार** — **- अध्यक्ष**
अपर जिल्हाधिकारी तथा
अपर दंडाधिकारी ठाणे,
जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रतिनिधी

२) **श्री. धनंजय पाटील** — **- प्रतिनिधी, सदस्य** सचिव
प्रादेशिक अधिकारी, — **म.प्र.नि. मंडळ यांचे प्रतिनिधी**
कल्याण

३) **श्री. अमर दुर्गुळे,** — **- सदस्य/आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण १

**जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे** -

सर्वप्रथम श्री. अमर दुर्गुळे , जनसुनावणीचे आयोजक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २००९ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी प्रस्ताव दिनांक १९.०८.२०१७ रोजी सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०८/११/२०१७ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दै. लोकमत" या मराठी वर्तमानपत्रात तसेच "दै फ्रि प्रेस जर्नल" या इंग्रजी वर्तमानपत्रात दि. ०४/१०/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे, असे सांगितले.

सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या सारांश प्रती -

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

२) मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई.

३) सहसंचालक (जलप्रदूषक नियंत्रण) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई.

४) कल्याण डोंबिवली महानगरपालिका
शंकरराव चौक, कल्याण (प), जिल्हा ठाणे.

५) प्रादेशिक अधिकारी, मुंबई/उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण -१, सिध्दीविनायक संकुल ३ रा मजला ,ऑक बागेजवळ स्टेशनरोड कल्याण (प) जिल्हा ठाणे.

या ठिकाणी लोकांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश लोकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले.

श्री. अमर दुर्गुळे, जनसुनावणीचे आयोजक यांनी प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक तांत्रिक सल्लागार हे प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर लोकांना त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, लोकांचे टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. चैतन्य साठे प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईडशो द्वारे सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित या प्रकल्पाच्या जागेचा तपशील तसेच जागेचे ठिकाण, प्रकल्प स्थळाची मांडणी, प्रकल्पाच्या १० किमी परिसरातील रस्ते महामार्ग, विमानतळ, पाण्याचे स्त्रोत, प्राचीन महत्वाची ठिकाणे, अभयारण्य इ. ची माहिती सादर केली. सदर प्रकल्पास २५० KVA इतक्या विदयुत उर्जेची गरज भासणार आहे. सदर प्रकल्पात कुशल अकुशल असे २० लोकांचे मनुष्यबळ लागेल. प्रकल्प धारकांनी पर्यावरणाच्या घटक अभ्यासामध्ये हवामान परिसरातील पाण्याची गुणवत्ता, हवेतील

गुणवत्ता, ध्वनीची पातळी, परिसरातील वनस्पती व पशु मातीचे पृथ:करण, सामाजिक व आर्थिक परिस्थितीबाबत केलेल्या अभ्यासाची माहिती आणि पृथ:करण अहवाल याचे सादरीकरण केले. प्रकल्प सुरू झाल्यानंतर पर्यावरणातील वायुची, ध्वनीची व परिसरातील पाण्याची गुणवत्ता तपासणी तीन महिन्यातून एकदा करण्यात येईल असे नमुद केले. सदर प्रकल्पामध्ये नागरी घनकचरा हा प्रकल्पाच्या ठिकाणी आल्यानंतर त्याचे विघटनकारी, अविघटनकारी अशी वर्गवारी करण्यात येईल. त्यानंतर विघटनकारी घनकचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खत निर्मिती केली जाईल तर अविघटनकारी कचऱ्याचे वर्गिकरण करून पुर्नचक्रित होणारा घनकचरा हा विकला जाईल व उर्वरित अविघटनकारी शास्त्रोक्त पदधतीने जमिनीमध्ये गाडला जाईल. सदर प्रकल्पामुळे दुर्गंधीयुक्त कच-यापासून सुटका, खत निर्मिती, वातावरणातील हरित वायुचे उत्सर्जन कमी होणे, सामाजिक दृष्टया फायदेशीर खत निर्मीतीमुळे आर्थिक उत्पन्न इ. फायदे होतील.

तदनंतर मा. अपर जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना असल्यास त्या मांडाव्यात तसेच प्रकल्प धारकाने याबाबत काय उपाययोजना केली जाईल यांची माहिती दयावी. या सर्वांची नोंद इतिवृत्तात घेतली जाईल व ते पुढे पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल, असे सांगितले.

**प्रश्न १. श्री. श्रीनिवास घाणेकर, कल्याण आग्रा रोड**

पर्यावरण विषयक अहवाल हा लोकांसाठी खुला करण्यात यावा. इतक्या कमी वेळेमध्ये आम्ही आमचे म्हणणे देवू शकणार नाही. या अहवालांमध्ये ब-याच गोष्टींचा उल्लेख केलेला नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून रिंग रोड प्रकल्पासाठी अदयाप जमिनी घेतल्या गेल्या नाहीत. रिंग रोड झाल्यावर हा प्रकल्प होणार का आधी रिंग रोड होणार याबाबत महापालिकेने खुलासा केलेला नाही. रिंग रोड झाल्यानंतर प्रकल्पाचा विचार करावा. सदर प्रकल्पामध्ये विजेची मागणी ही 25 मेगावॅट दर्शविली आहे. जर इतकी विज लागणार असेल तर प्रकल्पाचा फायदा काय ? सदर अहवालामध्ये वालधुनी नदीच्या पाण्याचे नमुने हे विहित मर्यादेत दाखविलेले आहेत. सध्या वालधुनी नदी प्रदूषणाबाबत न्यायालयात खटला चालू आहे. हवेतील धुलीकणांचे प्रमाण हे मर्यादीत दर्शविले आहे. परंतु, सद्य परिस्थतीत या ठिकाणी धुलीकणांचे प्रमाण जास्त आहे.

**उत्तर:- श्री. अमर दुर्गुळे आयोजक**

सदर प्रकल्पाची जाहिरात ही "दै. लोकमत' या मराठी वर्तमानपत्रात तसेच "दै. फ्रि प्रेस जर्नल" या इंग्रजी वर्तमानपत्रात दि. ०४/१०/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तसेच

प्रकल्पधारकाने तयार केलेला पर्यावरणविषयक अहवाल हा लोकांना अभ्यासण्यासाठी तसेच त्यांच्या सूचना / तक्रारी नमूद करण्यासाठी पयार्वरण विभाग मंत्रालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुख्यालय, मुंबई, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, प्रादेशिक कार्यालय कल्याण येथे १ महिन्यापूर्वी ठेवण्यात आलेला होता.

**प्रश्न २. श्री. अरविंद बुधकर**

वालधुनी नदी प्रदूषित आहे त्यावर उपाययोजना केली नाही आमच्या भागात रस्त्याची समस्या आहे तसेच पायाभूत सुविधांचा अभाव आहे.

**प्रश्न ३. श्री. धीरज पाटील, श्री. कॉम्प्लेक्स चौक उंबर्डे**

माझ्या सहकाऱ्यांनी मांडलेल्या सर्व प्रश्नांशी मी पूर्णपणे सहमत आहे. सल्लागार यंत्रणेने बनविलेल्या अहवालामध्ये त्रुटी आहेत. सी.आर.झेड / आर.आर.झेड चा नकाशा विचारात घेतला नाही. प्रस्तावित प्रकल्प पुरक्षेत्रात येत आहे. या भागात ऐतिहासिक आणि प्राचीन वास्तु आहेत. त्याचा समावेश अहवालामध्ये नाही.

**प्रश्न ४. श्रीमती अश्लेषा थोरात, गोदरेज हिल, खडकपाडा**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खडकपाडा गोदरेज हील हा भाग विकसित व प्रगत झालेला आहे. तुम्ही या ठिकाणी हा प्रकल्प राबवत आहात. आमच्या भागात कचऱ्याच्या गाड्या येत नाही. लोकांना घनकचरा हा वेगवेगळा करणे म्हणजे काय याबाबत माहिती नाही. सदर प्रकल्पाच्या भागात शाळा, वस्ती, सोसायटी आहे. त्यामुळे सदरचा प्रकल्प या ठिकाणी करू नये.

**प्रश्न ५. श्रीमती कुंदा जाधव**

कचऱ्याच्या गाड्या ४-४ दिवस आमच्या भागात येत नाहीत. कच-याची वाईट परिस्थती आहे.

**प्रश्न ६. श्रीमती अश्विनी पुरोहित (गोदरेज हिल)**

मी रहात असलेल्या माधवसृष्टी या भागात मोठया प्रमाणात नागरी घनकचरा साठला आहे, तो पहिला साफ करावा. मगच या प्रकल्पाबददल विचार करावा. तेथे पायाभूत सुविधांचा अभाव आहे. कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी लोकांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.

त्यांच्या घरातुन निर्माण होणारा कचरा हा तिथेच वेगळा वेगळा करून त्यावर त्यांच्या संकुलनात प्रक्रिया करणे शक्य होईल.

**प्रश्न ७. श्रीमती उपेक्षा भोईर (नगरसेविका टिटवाळा)**

सदर प्रकल्पाचे महानगरपालिकेने टेंडर काढले आहे व कामाच्या निविदा पण निघाल्या आहेत. तर पुढील सुनावणी घेताच कशाला ?

**श्री. अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकरी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण.**

प्रकल्पधारकाने प्रकल्पाचे पर्यावरण अनुमतीसाठी राज्य पर्यावरण अनुमती समितीकडे अर्ज दाखल केलेला होता. सदर समितीने प्रकल्पधारकास घातलेल्या अटीमध्ये सदर प्रकल्पाची पर्यावरण जनसुनवणी घेण्याबाबत कळविले होते. प्रकल्प धारकानी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी अर्ज केल्याने अर्जाची जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

**प्रश्न ८. श्री. अशोक मांडले**

हा प्रस्ताव चुकीचा आहे. ८ एप्रिल २०१६ ला भारत सरकारने राजपत्र प्रसिध्द केले होते. त्यामध्ये शास्त्रोक्त पदधतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेबाबत नियमावली दिलेली आहे. सदरचा प्रस्तावित प्रकल्प हा दाट लोकवस्तीमध्ये आहे. तसेच प्रकल्प हा पुररेषेमध्ये आहे. अहवालातील आकडेवारीमध्ये त्रुटी आहेत.

**प्रश्न ०९. श्री. सुनिल घेगडे**

महानगरपालिकेने बी. एस. यू. पी. प्रोजेक्टला आणला आहे. त्यात २१ बिल्डींग आहेत. मग तिथे रहात असणाऱ्या लोकांचे काय ? अहवालात लिहिले आहे की लोकवस्ती ३/४ किमी लांब आहे. प्रकल्प साईट पुररेषेत येते आहे.

**प्रश्न १०. श्री. मनोज पाटील**

सदर प्रकल्प हा आधारवाडी डंपिंग ग्राउंड बंद करायचे हायकोर्टाचे आदेश असल्याने नवीन जागा कुठे शोधायची म्हणून जबरदस्तीने हे दोन्ही प्रकल्प या ठिकाणी आणत आहात का ? आम्ही सुजाण नागरिक आहोत व प्रकल्पाच्या विरोधात आहोत.

**उपस्थित नागरिक**

उंबर्डे किंवा बारवे गावचा प्रकल्प असू द्या. महापालिकेच्या तांत्रिक सल्लागारांनी सर्वे केला आहे. त्या अहवालामध्ये त्रुटी आहेत. आता सादरीकरण दाखवून काही उपयोग नाही. आम्ही प्रकल्पाच्या विरोधात आहोत.

**प्रश्न ११. श्री. देवानंद भोईर (वाडेघर)**

वाडेघर हे गाव ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे आहे. येथे शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ला आहे. या भागातील डंपिंग ग्राउंड लवकरात लवकर हलवावे.

प्रकल्प प्रवर्तकाचे तांत्रिक सल्लागार डॉ. चैतन्य साठे यांनी सांगितले की, या समोरच्या म्हणजेच बारवेच्या प्रकल्पाच्या सादरीकरणामध्ये आम्ही सर्व बाबींचा उल्लेख केलेला आहे. जसे वालधुनी नदीचे पाणी पिण्यायोग्य नाही. तसेच प्राचीन स्थळांसंदर्भात प्रशासकीय व्याख्या अनुसार टिप्पणी केली आहे. प्रकल्पाच्या भागात ज्या वेगवेगळया सुविधा प्रकल्पाच्या अंतर्गत केल्या जाणार आहेत त्या दाखविण्यात आल्या आहेत. आम्ही या भागातील हवेची गुणवत्ता तपासणी, मातीचे तसेच पाण्याचे नमुने पर्यावरण मंत्रालयाच्या मानकानुसार घेतलेले आहेत. या व्यतिरिक्त प्रकल्पस्थळी होणाऱ्या सुविधा जसे की, रेन वॉटर हार्वेस्टिंग, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, लीचेट ट्रिटमेंट प्लांट होणार आहे असे सांगितले. प्रकल्पाचा फायदा डोंबिवली शहराला होणार आहे. खताची निर्मिती होणार असल्याने शहरातील कचऱ्याची योग्य तसेच शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट होणार आहे.

**श्री. धनाजी तोरस्कर, उपायुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

आता बारवेच्या प्रकल्पाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, ज्या समितीसमोर हा प्रस्ताव मान्यतेसाठी जाणार त्या समितीच्या सदस्यांनी बारवेच्या प्रकल्पास्थळी भेट दिलेली आहे. आपणाप्रमाणेच संबंधित समिती सदस्यांनी पण प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे सर्व बाबींचा अभ्यास करून शासन स्तरावरील समिती मार्फत योग्य निर्णय घेतले जातील.

**श्री. अनिल पवार, अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी**

या जनसुनावणीचा अध्यक्ष म्हणून मी तुमच्या सर्वांच्या टिका, आक्षेप, प्रश्न व ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांची नोंद इतिवृत्तामध्ये घेतली जाईल. सदर बैठकीचे इतिवृत्त हे पुढे पर्यावरण विभागास पाठविले जाईल. सध्या प्रकल्पाच्या ठिकाणी १० मेट्रीक टन बायोमिथेनायझेशन प्रकल्प

उभारलेला आहे. तो कार्यरत असून त्यामध्ये मिथेन वायूची निर्मिती होते. सदर प्रकल्पाचा आताच्या उंबर्डे घनकचरा प्रकल्पाशी संबंध नाही.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपली निवेदने ही पुढे पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी यशस्वी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अमर दुर्गुळे)** | **(ध. बा. पाटील)** | **(अनिल पवार)** |
| **उप प्रादेशिक अधिकारी** | **प्रादेशिक अधिकारी** | **अपर जिल्हाधिकारी तथा** |
| **म.प्र.नि. मंडळ, कल्याण** | **म.प्र.नि. मंडळ, कल्याण** | **अपर जिल्हादंडाधिकारी, ठाणे** |
| **आयोजक/सदस्य** | | **अध्यक्ष** |
| **जनसुनावणी समिती** | | **जनसुनावणी समिती** |